CNR NO. MHST120008262025

# निशाणी क्र. १७ खाली आदेश

(पारित दिनांक ०६/०७/२०२६)

वादी यांनी सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२) दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज, त्यावरील लेखी म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. सदर अवलोकनावरुन सदर अर्जाच्या निकालाकामी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणमिमांसेसह त्यापुढे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी वादपत्रामध्ये केलेली मागणी ही दावा निकाली होण्याकरीता आवश्यक आहे काय ? | होय. |
| २) | वादींचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | वादींचा अर्ज मंजूर करणेत येतो |

३) वादी यांनी आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, सदरचा दावा हा त्यांनी प्रतिवादी विरुध्द वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. सदरचा दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीमधील काही हिस्सा म्हणजेच काही क्षेत्र ति–हाईत इसमासस विक्री केलेले आहे. त्यामुळे वादीस सदरची दुरुस्ती कायद्याने करणे आवश्यक आहे. त्यामुळे खरेदीदार यांना प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे कायद्याचे दृष्टीने

गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यामधील सरनाम्यात प्रतिवादी क्र. ८ संपल्यानंतर प्रतिवादी क्र. ९ असा आकडा नमूद करुन बाळू वसंत पाटोळे व.व. ४३ धंदा–शेती रा. हिंगणी ता. माण जि. सातारा अशी दुरुस्ती नि. १ वरती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

४) तसेच दावा कलम ६ संपल्यानंतर ६अ असा आकडा नमूद करुन खालीलप्रमाणे दाव्यामध्ये मजकुर समाविष्ट करण्यास व तशी दुरुस्ती करण्यास वादीस मे. कोर्टाची परवानगी असावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

६अ. सदरील दावा कलम १ मधील दावा मिळकतीबाबत वादी, प्रतिवादी यांचे दरम्यान सरस निरस मानाने वाटपाचा दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र. १ यांनी एकत्र कुटूंबास कोणत्याही प्रकारची कायदेशीर नड व गरज नसताना एकत्र कुटूंबाची मिळकत विक्री करणेचा कायद्याने त्यांना हक्क व अधिकार नसताना वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांना दावा मिळकतीमधील असणारा कायदेशीर हक्क व अधिकार डावलणेचे वाईट हेतूने प्रतिवादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. ९ यास खरेदीदस्त दि. १०/१२/२०२५ रोजी दस्त क्रमांक मनद ४५०४/२०२५ अन्वये दावा मिळकत गट नं. ४६६ मधील लागवडीलायक ०० हे. ३६.८४ आर व पोट खराब ०० हे. ०२.८६ आर असे एकूण ०० हे. ३९.७० आर क्षेत्र विक्री केलेचे नुकतेच वादींना समजलेले आहे. सदरील प्रतिवादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. ९ यास करुन दिलेले खरेदीदस्त हा पोकळ, बिनकब्जाचा, बिनभरण्याचा असून सदर दस्ताने प्रतिवादी क्र. ९ यास कोणत्याही प्रकारची मालकी व कब्जा प्राप्त झालेला नव्हता व नाही. आजही दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांचीच कब्जे वहिवाट निरंतरपणे चालु आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ९ यास दि. १०/१२/२०२५ रोजी रजिस्टर दस्त क्र. मनद ४५०४/२०२५ हा प्रस्तुतचा दावा मे. कोर्टात प्रलंबीत असतांना वाद तत्व या कायद्याच्या तत्वाची बाधा येत आहे. त्यामुळे दस्त क्र. मनद ४५०४/२०२५ हा वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७

यांचे हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठरावा करण्यात यावा" अशी विनंती त्यांनी केली आहे.

५) तसेच सदर दावा कलम १० विनंती पॅरा मधील ब/१ असा आकडा टाकून नमूद करुन खालीलप्रमाणे दाव्यामध्ये मजकुर समाविष्ट करण्यास व तशी दुरुस्ती करण्यास वादी मे. कोटाची परवानगी असावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

"ब/१) सदर प्रतिवादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. ९ यास खरेदीदस्त दि. १०/१२/२०२५ रोजी दस्त क्र. मनद ४५०४/२०२५ अन्वये करुन दिलेल्या खरेदीदस्तास वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांचे हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव करण्यात यावा " अशी विनंती त्यांनी केली आहे. सदरची दुरुस्ती हि किरकोळ व स्पष्टीकरणात्मक अशा स्वरुपाची आहे. सदरचे दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात काहीएक बदल होत नाही. सदरची दुरुस्ती मंजूर न झालेस प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणा नाही. तसेच सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होत नाही. उलट सदरची दुरुस्ती मंजूर न झालेस वादीचे फार मोठया प्रमाणावर नुकसान होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

६) सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांनी वादीचा सदरचा दुरुस्ती अर्ज हा खोटा व लबाडीचा असुन प्रतिवादी क्र. १ यांनी खरेदी घेतलेल्या मिळकतीतील हिस्याप्रमाणे ति-हाईत इसमास विक्री केलेला आहे. तरी वादीस हारकत घेण्याचे कारण नाही वादी यांना ति-हाईत इसमास प्रतिवादी क्र. ९ म्हणून सामील करण्याचा काहीच अधिकार नाही. तरी वादी यांचे काहीच नुकसान होणाार न ाही तरी सदचा वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व अर्ज मंजूर करावयाचा झाल्याचा कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

७) वादीचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास

येते की वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील प्रस्तावित दुरुस्ती पाहता ती तांत्रीक स्वरुपाची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदरची दुरूस्ती ही मान्य केली गेली नाही तर त्याबाबत वादीस नवीन दावा दाखल करावा लागेल म्हणून एकाच पक्षकारांमध्ये त्याच वादमिळकतीबाबत अनेक दावे निर्माण होवून त्यात गुंतागुंत निर्माण होणार आहे. अशा परिस्थितीत सदरचा वाद विषय हा पूर्णपणे निकाली होणार नाही. तसेच सदर दाव्यात आवश्यक असणा–या मिळकती या देखील दाव्यात सामील करुन घेणे हे दावा पुर्णांशाने निकाली होणे कामी आवश्यक ठरत आहे. सदर प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही.

८) वर नमूद बाबींचा व संचिकेचे अवलोकन करता असे दिसून आले की, प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याच्या अंतिम निकालावर निर्माण होणाऱ्या उभय पक्षकारांतील वादप्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल. अशा परिस्थीतीत मी सदर अर्जाचे मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देवून मुदुदा क्र. २ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) वादीचा नि. १७ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२) वादीने विनंती केल्याप्रमाणे दुरुस्ती १४ दिवसांचे आत करुन घ्यावी.

SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Digitally signed by SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Date: 2026.07.06 17:00:46 +0530

(एस. एस. साळुंखे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, म्हसवड

दिनांक ०६/०७/२०२६

नियमित दिवाणी दावा क्र. ६४१/२०२५
निशाणी क्र. १७ खाली

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | R.A.Tarange, Stenographer (Grade III) |
| Name of Court | C.J.J.D., Mhaswad, Tal.Man |
| Date of Dictation | 06/07/2026 |
| Order signed by the P.O. on | 06/07/2026 |
| Order uploaded on | 06/07/2026 |